# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २१.०२.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २०/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८९ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४३,८००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २०/०२/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ०१.२६ लिटर दारू असा एकुण ७००/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. २०/०२/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०४ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रूपए एक मोसा व एक मोबाईल असा एकुण ९४,४७०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**दुखापत :—** दि.२०/०२/२०२३ रोजी पोस्टे हटटा येथे ०१ गुन्हा कलम ३२४,३२३,५०४,३४ भादंवि अन्वये प्रमाणे दाखल होवुन यातील आरोपीतांनी संगणमत करून आरोपी क्र १ याने फिर्यादीस उसने दिलेले पैशे दे म्हणुन शिवीगाळ करून धक्काबुक्की केली व आरोपी क्र २ याने फिर्यादीचे शर्टास धरून खाली पाडले फिर्यादी खाली पडल्याने फिर्यादीचे डोक्यास दगड लागुन जखमी केले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात येवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.